लोकमत

# रघुनाथ माशेलकर यांचे उद्या व्याख्यान



कोल्हापूर : शिवाजी विद्यापाठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने उद्या, सोमवारी ख्यातनाम शास्त्रज्ज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे व्याखान आयोजित केले आहे. हे व्याख्यान झूम या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर दुपारी २.१५ वाजता होणार आहे. "इनोव्हेशन लीड आक्सिलिरेटेड इन्क्लुसिव्ह ग्रोथ" या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असणार आहेत. अशी माहिती विभागप्रमुख प्रा. ज्ञानदेव तळले यांनी दिली. अर्थशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. यात डॉ. रघुनाथ माशेलकर मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सेमिनार व वर्कशॉप या मथळ्याखाली व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

22 AUG 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहाजी महाविद्यालय बहुजन विद्यार्थ्यांसाठी आधार ठरले

## शाहू छत्रपती यांचे गौरवोदगार : सुवर्णमहोत्सवी सांगता समारंभ थाटात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी शाहू शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याच आधारे कार्यरत असलेले शहाजी महाविद्यालय बहुजनांसाठी आधार ठरले, असे गौरवोद्गार शाहू छत्रपती यांनी शनिवारी येथे काढले.

येथील शहाजी महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवाच्या सांगता समारंभामध्ये ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आमदार पी. एन. पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल पाटील, संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे उपस्थित होते.

शाहू छत्रपती म्हणाले, यापुढचा काळ अवघड आहे. शिक्षण संस्था वाढल्या आहेत. अशा काळात गुणवत्तेच्या स्पर्धेत टिकण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत राहण्याची गरज आहे. कुलगुरू शिर्के म्हणाले, मी सुद्धा या बोर्डिंगचा विद्यार्थी आहे. येथील वि. रा. शिंदे अध्यासन केंद्रास चालना देण्याची गरज असून, त्यासाठी शिवाजी विद्यापीठ या महाविद्यालयाशी सामंजस्य करार करेल.




शहाजी महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सवी वर्ष सांगता समारंभ शनिवारी झाला. यावेळी महाविद्यालयाच्या वाटचालीचा वेध घेणाऱ्या ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, शाहू छत्रपती, आमदार पी. एन. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी माणिक मंडलिक, राहुल पाटील, डॉ. डी. आर. मोरे, शिवाजी कवठेकर, प्राचार्य आर. के. शानेदिवाण उपस्थित होते.

### पुस्तक लिहिणाऱ्यांचे कॉलेज

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, पुस्तक लिहिणाऱ्यांचे कॉलेज म्हणून शहाजी कॉलेजचे नाव आघाडीवर होते. ते यापुढेही तसेच राहण्यासाठी प्राध्यापकांनी अधिकाधिक संशोधन व लेखन करावे. पन्हाळ्याच्या पायथ्याशी असणाऱ्या दत्त मंदिरामध्ये या संस्थेची चार विद्यार्थ्यांवर सुरुवात झाली. त्याचा आज वटवृक्ष होताना खूप आनंद होत आहे.

आमदार पी. एन. पाटील म्हणाले, जगाने तंत्रज्ञानात, संशोधनात भारताची मदत घ्यायला हवी अशा पद्धतीचे शिक्षण-संशोधन होण्याची गरज आहे. या शिक्षण संस्थेमध्ये सर्वसामान्य विद्यार्थी घडविण्यासाठी श्रीपतराव बोंद्रे आग्रही होते. डॉ. डी. आर. मोरे, सुधाकर मानकर यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी 'वाटचाल ५० वर्षांची' स्मरणिका व 'Our Research' या संशोधन पुस्तिकेचे प्रकाशन झाले. माजी प्राध्यापक, प्रशासकीय सहकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले. यावेळी विजयराव बोंद्रे, शिवाजीराव कवठेकर, माणिक मंडलिक उपस्थित होते.

पुढारी

# कोरोनामुळे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांमध्ये वाढ : डॉ. नरेंद्र जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिड-१९ च्या महामारीमुळे देशातील दारिद्र्यरेषेवर असणारी बहुसंख्य कुटुंबे या काळात दारिद्र्यरेषेखाली ढकलली गेली आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपल्याला नजीकच्या काळात एकजुटीने काम करावे लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व राज्यसभा सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'आर्थिक धोरणे व सद्यस्थिती' या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत पहिले पुष्प गुंफताना 'माझा जीवनकाळ' या विषयावर डॉ. जाधव बोलत होते. या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात प्रमुख उपस्थित होते.

डॉ. जाधव म्हणाले, भारताने १९९१ मध्ये जे नवे जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले, त्यामध्ये अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या बरोबरीनेच भारतीय रिझर्व्ह बँक आणि तत्कालीन गव्हर्नर वेंकटरमण या अत्यंत विद्वान व्यक्तिमत्त्वांचेही महत्त्वाचे योगदान राहिले आहे. देशहिताच्या अनेक प्रश्नांबाबत चर्चा करून मार्ग काढण्याची संधी लाभल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

तरुण भारत

# ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. माशेलकर यांचे विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र



विभागाच्यावतीने सोमवार, २३ रोजी दुपारी २.१५ वाजता पद्मविभूषण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. ते झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर 'इनोवेशन लीड आक्सिलीरेटेड इन्क्लुसीव ग्रोथ' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. या व्याख्यानासाठी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विभागातील प्राध्यापक डॉ. यशवंत थोरात, प्रा. ज्ञानदेव तळुले उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठांच्या वेबसाईटवर सेमिनार आणि वर्कशॉप या मथळ्याखाली लेक्चर सेरीज इन ईकॉनोमिक्स येथे व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी या व्याख्यानाला विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि अन्य अभ्यासकांनी ऑनलाईन उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे.